गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक १२० वा | रविवार १७ सप्टेंबर २०२३ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 120 | Date : 17/09/2023 | blow : Sunday | Page 4 | Price 4

# मराठवाड्याच्या शाश्वत विकासाला शासनाचे सर्वोच्च प्राधान्य : मुख्यमंत्री




छत्रपती संभाजीनगरः मराठवाड्याच्या विकासाचे मध्यवर्ती केंद्र म्हणून छत्रपती संभाजी नगरची ओळख आहे. छत्रपती संभाजी नगरसह मराठवाड्यातील पायाभूत सुविधांसाठी शासनाने वेळोवेळी निधी उपलब्ध करुन दिला आहे. मराठवाड्याच्या शाश्वत विकासाला शासनाचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.शहरातील वंदे मातरम सभागृहात मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त महापालिकेच्या विविध विकासकामांचे उदघाटन व लोकार्पण मुख्यमंत्री श्री.शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

व्यासपीठावर केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, उपमुख्यमंत्री अजित पवार, रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संदिपान भुमरे, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, कृषी मंत्री धनंजय मुंडे, आरोग्य मंत्री तानाजी सावंत, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, अल्पसंख्याक विकास मंत्री अब्दुल सत्तार, खासदार सय्यद इम्तियाज जलील,आमदार सतीश चव्हाण, आमदार विक्रम काळे, आमदार संजय शिरसाट, आमदार हरिभाऊ बागडे, आमदार प्रदीप जैस्वाल, आमदार नारायण कुचे, आमदार राजू नवघरे, आमदार बाळसाहेब आजबे, विभागीय आयुक्त मधुकरराजे आर्दड, जिल्हाधिकारी आस्तिककुमार पाण्डेय, मनपा आयुक्त जी. श्रीकांत आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री शिंदे म्हणाले, भारतीय स्वातंत्र्य संग्रामाइतकाच प्रखर लढा मराठवाडा मुक्ती संग्रामासाठी लढला गेला. स्वातंत्र्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन अनेक स्वातंत्र्य सेनानींच्या त्यागाने, कष्टामुळे तसेच त्यांच्या बलिदानामुळे निजामाच्या जुलमी राजवटीतुन मराठवाडा मुक्त होऊन स्वतंत्र झाला. या स्वातंत्र्य सेनानींच्या बलिदानाची जाणीव प्रत्येकाने ठेवण्याची गरज असल्याचेही ते म्हणाले.

मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्याचे एक वेगळे वैशिष्ट आहे. त्यात छत्रपती संभाजी नगरचा इतिहास प्रेरणादायी आहे. मराठवाड्याचे मध्यवर्ती केंद्र म्हणून ओळख असलेल्या छत्रपती संभाजी नगर शहराने शैक्षणिक, आरोग्य, औद्योगिक, पर्यटन यासह सर्वच क्षेत्रातील विकासामध्ये भरारी घेतली आहे. राज्य शासनाने मराठवाड्याच्या विकासाला नेहमीच प्राधान्य दिले असुन गतकाळात पाणी पुरवठा योजनेसाठी २ हजार ७७४ कोटी, रस्त्यांच्या कामासाठी ५०० कोटी, पैठण येथील जलवाहिनीच्या दुरुस्तीसाठी २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

मराठवाड्यातील जनतेला पाणी, वीज, रस्ते यासारख्या मुलभूत सुविधांसाठी शासनाने निधी देण्याचे काम केले असल्याचेही मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी सांगितले.

मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी केंद्र शासनाच्या सहकार्याने वॉटरग्रीड प्रकल्प तसेच नद्यांचे वाहुन जाणारे पाणी मराठवाड्यात वळविण्यासाठी काम करण्यात येत आहे. नद्यांचे वाहुन जाणारे पाणी वळविण्यासाठीच्या कामास मंजुरी देण्यात आली आहे. त्याचा डीपीआर बनविण्याचे काम सुरु आहे. केंद्र सरकार राज्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे असुन राज्याच्या विकासामध्ये केंद्र सरकारमार्फत भरीव तरतूद करण्यात येत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याचे सांगत मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, मराठवाड्यात अनियमित पर्जन्यमानामुळे उदभवणाऱ्या समस्येवर । **पान २ वर**

## ‘इंडिया’ आघाडीची पहिलीच भोपाळची सभा रद्द

नवी दिल्ली : भाजपविरोधात ‘इंडिया’ आघाडी भोपाळमध्ये जाहीर सभा घेणार असल्याचे ‘इंडिया’ आघाडीच्या बैठकीत ठरले होते. मात्र, आता भोपाळमध्ये होणारी ‘इंडिया’ आघाडीची जाहीर सभा रद्द करण्यात आल्याची माहिती मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री कमलनाथ यांनी दिली आहे. आगामी निवडणुकीत मोदीशहांना सत्तेपासून रोखण्यासाठी विरोधकांनी जोरदार तयारी सुरू केलेली असतानाच आता ‘इंडिया’ आघाडीत बिघाडी झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. याबाबत पत्रकारांनी कमलनाथ यांना प्रश्न विचारला असता त्यांनी सभा रद्द झाली आहे, असे उत्तर दिले. तर मध्य प्रदेश निवडणूक प्रभारी रणदीप सूरजेवाला यांनी पत्रकारांच्या प्रश्नावर आमची चर्चा सुरू असल्याचे म्हटले आहे. सध्या काही अंतिम निर्णय झालेला नाही, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासोबत बैठक आहे, त्यानंतर रॅलीचे ठरवू असे ते म्हणाले.

## काश्मिरात तीन दहशतवाद्यांचा खात्मा



बारामुल्ला : जम्मू काश्मीरमधील बारामुल्लाच्या उरी भागात शनिवारी पहाटेच्या सुमारास नियंत्रण रेषेजवळ तीन दहशतवाद्यांनी घुसखोरीचा प्रयत्न केला. मात्र, जवानांच्या सतर्कतेमुळे संयुक्त कारवाईत तीन दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला. यामधील दोन दहशतवाद्यांचे मृतदेह सापडले. परंतु तिसरा दहशतवादी मारला गेला असून, तिसऱ्या दहशतवाद्याचा मृतदेह शोधून काढण्यात येत असल्याची माहिती भारतीय लष्कराने दिली आहे. पाक पोस्टजवळील नियंत्रण रेषेवर मृतदेह असल्याने काढण्यात व्यत्यय येत असून, लष्कराची कारवाई सुरू असल्याचेही भारतीय लष्कराने म्हटले आहे.

## पंतप्रधान मोदींच्या हस्ते आज ‘पीएम विश्वकर्मा’ योजनेचा प्रारंभ होणार

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज (१७ सप्टेंबर २०२३) नवी दिल्लीत ‘पीएम–विश्वकर्मा’ या केंद्रीय क्षेत्र योजनेचा प्रारंभ करण्यात येणार आहे. पारंपारिक कारागीर आणि हस्तकलेतील निपुण कारागिरांना ओळख आणि सर्वांगीण मदत करण्यात येणार आहे. तसेच त्यांच्या उत्पादनांची गुणवत्ता, निर्मिती आणि व्याप्ती वाढवणं, त्यांना एमएसएमई मूल्य साखळींमध्ये सामावून घेणं हा या योजनेचा उद्देश आहे.

संपूर्ण सरकार या दृष्टिकोनांतर्गत, लाभार्थ्यांमध्ये व्यापक जनजागृती करण्यासाठी आज देशाच्या विविध भागांमध्ये सुमारे ७० ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार आहे. केंद्रीय मत्स्यउद्योग, पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय मंत्री परुषोत्तम रुपाला हे आज कर्नाटकमधील मंगळूर येथे मत्स्यउद्योग , पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागाच्या वतीने आयोजित ऐतिहासिक कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.



भारतात कला आणि हस्तकला यांचे विविध प्रकार असून ती प्राचीन आहे आणि मूल्ये आणि श्रद्धा याबाबतीत समृद्ध आहेत. पारंपारिक कारागीर आणि कलाकारांना परंपरेनुसार ’विश्वकर्मा’ म्हणून संबोधले जाते. ते कलात्मक क्षमतेने काम करतात, पारंपरिक साधने आणि तंत्रे वापरुन आपल्या हातांनी वस्तू साकारतात. विश्वकर्मा हे या देशाचे निर्माते आहेत. दरम्यान, केंद्रीय मंत्रिमंडळानं १६ ऑगस्ट २०२३ रोजी संपूर्ण भारतात ’पीएम विश्वकर्मा योजना’ नावाची नवीन योजना लागू करायला मान्यता दिली होती. हा पारंपारिक कारागीर आणि कलाकारांसाठी एक दूरदर्शी निर्णय घेतला आहे.

पंतप्रधान विश्वकर्मा योजनेंतर्गत केंद्र सरकारने १८ पारंपारिक व्यवसायांचा समावेश केला आहे. मासेमारीचे जाळे विणणारे, शिंपी, परीट (धोबी ), फुलांचे हार बनवणारे ,न्हावी , पारंपरिक बाहुल्या आणि । **पान २ वर**

## ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या उभारणीत साखर उद्योग आपला ठसा उमटवेल : शरद पवार



पुणे : भारताच्या अखंड ऊर्जा कार्यक्रमात इथेनॉल, बायो–सीएनजी आणि हायड्रोजन ही नवीन क्षितिजे असून त्यांचा वापर करण्याची उपजत क्षमता साखर उद्योगात आहे. त्यामुळे भारताच्या अखंड ऊर्जा अभियानाला गती देऊन सक्षम ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या उभारणीत साखर उद्योग आपला ठसा उमटवेल, असा विश्वास को–जनरेशन असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष, ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांनी व्यक्त केला. को–जनरेशन असोसिएशन ऑफ इंडियातर्फे आयोजित ‘साखर कारखान्यांच्या हरित आणि अक्षय ऊर्जेसाठी एकात्मिक धोरण’ या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन आणि राष्ट्रीय को–जनरेशन पुरस्कारांचे वितरण शनिवारी पवार यांच्या हस्ते वाकड येथे झालेल्या कार्यक्रमात करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. पवार म्हणाले, भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा वीज उत्पादक आणि वीज ग्राहक देश आहे. सरकारने नवीन । **पान २ वर**

## ‘काँग्रेसची सत्ता आली तर संभाजी भिडे यांना तुरुंगात टाकू’, विजय वडेट्टीवारांचं टीकास्त्र



चंद्रपूर : काँग्रेसची सत्ता आली तर संभाजी भिडे यांना तुरुंगात टाकू असं म्हणत विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी शिवप्रतिष्ठानचे संभाजी भिडे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. चंद्रपुरातील एका कार्यकर्ता मेळाव्यात वडेट्टीवार यांनी हजेरी लावली. यावेळी बोलतांना त्यांनी राज्यसरकारवर देखील निशाणा साधला. वडेट्टीवार यांनी त्यांच्या भाषणामध्ये अजित पवारांवर टीका केली. तसेच मराठवाड्याच्या मंत्रीमंडळावर सुद्धा त्यांनी भाष्य केलं आहे. यावर बोलतांना त्यांनी म्हटलं की, बैठक म्हणून छत्रपती संभाजीनगरमध्ये कोण कशासाठी गेलं होतं, हे आम्हाला चांगलचं माहित आहे. आमच्याकडे सर्व पुरावे आहेत.

महात्मा गांधी आणि महात्मा फुलेंवर संभाजी भिडे यांनी केलेल्या टीकेवरुन। **पान २ वर**

## लिबियामध्ये धरण फुटून महापूर, जवळपास २० हजार जणांचा मृत्यू, पाण्यावर तरंगतायत मृतदेह

नवी दिल्ली : संपूर्ण जगाला हादरवणारी घटना लिबियामध्ये घडली आहे. लिबियात आलेल्या महापुरामुळे डेरना शहर उद्धवस्त झालं आहे. महापुरामुळे डेरना शहरातील दोन धरणं फुटली आणि सव्वा लाख लोकसंख्या असलेलं संपूर्ण शहर पाण्याखाली गेलं. असंख्य लोक, त्यांची घरंदारं आणि संपूर्ण संसार पाण्यात वाहून गेला. या दुर्दैवी घटनेत जवळपास २० हजार जणांचा मृत्यू झाला आहे, तर अनेक जण बेपत्ता आहेत.चक्रीवादळ, महापुरामुळे तुटलेल्या इमारती, साचलेले मातीचे ढिग, एकमेकांवर पडलेल्या गाड्या शहरात पसरलेल्या दिसत आहेत. या भयावह परिस्थितीमुळे साचलेल्या चिखलात पाऊल टाकलं तर कधी पायाखाली कुणाचा मृतदेह सापडेल, हेही कुणालाच सांगता येत नाही. या दुर्घटनेतील मृतांची संख्या वाढून ४० हजारांवर जाण्याची भीती देखील व्यक्त केली जात आहे.



लिबियात राहणाऱ्या लोकांना आधीच आठवडाभरापासून चक्रीवादळाचा सामना करावा लागत होता, त्यातच धरणं फुटल्याने संपूर्ण डेरना शहराचा विध्वंस झाला. महापुरात गुरं, माणसं, घरं, सर्वकाही वाहून गेलं. गावांना नदीचं स्वरुप आलं. धरण फुटल्याने आतापर्यंत लिबियातील ४० हजार लोक मृत्यूमुखी पडल्याची भीती व्यक्त केली जात आहे. जे लोक मृत्यूमुखी पडले त्यांचे मृददेह देखील सापडत नाही, हजारो लोक बेपत्ता झाले आहेत. जे या परिस्थितून वाचले, त्यांची मानसिक स्थिती हलली आहे, लोकांच्या मनावर याचा प्रचंड परिणाम झाला. आपल्या प्रियजनांना शोधण्यासाठी या लोकांचा जीव कासावीस होत आहे.। **पान २ वर**

## ‘विवेकानंद’ प्रतिष्ठानकडून २२ सप्टेंबर पासून गणेशोत्सव व्याख्यानमालेचे आयोजन

अक्कलकोट/प्रतिनिधी : विवेकानंद प्रतिष्ठान, अक्कलकोटच्यावतीने प्रतिष्ठानचे अध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली यंदा गणेशोत्सव व्याख्यान मालेचे आयोजन २२ सप्टेंबर २०२३ ते २७ सप्टेंबर २०२३ रोजी सायं.६ वा. प्रियदर्शिनी सांस्कृतिक भवन येथे आयोजित केल्याची माहिती आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

या पत्रकार परिषदेस प्रतिष्ठानचे ज्येष्ठ सदस्य मल्लिनाथ कल्याणशेट्टी सर, मल्लिकार्जुन मसुती, अशोक येणगुरे, विलास कोरे, मिलन कल्याणशेट्टी, मल्लिकार्जुन आ, महेश कापसे, गुरुपादप्पा आळगी, मनोज कल्याणशेट्टी, विक्रम शिंदे, नितीन पाटील, अमोल कोकाटे, चंद्रकांत दसले आदीजण उपस्थित होते. यंदाही महाराष्ट्र व कर्नाटकातील दिग्गज नामवंत व्याख्याते व्याख्यानमालेत हजेरी लावणार आहेत.गणेशोत्सव व्याख्यानमालेस शुक्रवार, २२ सप्टेंबर रोजी पहिले पुष्प बेंगळुर येथील प्रख्यात हृदयरोगतज्ञ डॉ.विजयालक्ष्मी बाळेकुंद्री ह्या ‘आहार आणि आरोग्य’ या विषयावर कन्नडमध्ये व्याख्यान देणार आहेत.शनिवार, २३ सप्टेंबर रोजी पुणे येथील दुर्गअभ्यासक, शिव व्याख्याते राहुल नलावडे हे ‘शिवरायांचे शिवभारत’ या विषयावर एलईडी प्रेझेटेंशनव्दारे व्याख्यान, रविवार २४ सप्टेंबर रोजी विज्ञान पत्रकार मयुरेश प्रभुणे (पुणे) हे इस्त्रोच्या मोहिमांचे प्रत्यक्षदर्शी अनुभव कथन एलईडी प्रेझेटेंशनव्दार ‘अंतराळावरची भारत मुद्रा’ करणार आहेत.

सोमवार, २५ सप्टेंबर रोजी गायिका व सिने नायिका, फिल्मफेअर अवॉर्ड विजेती केतकी माटेगांवकर यांचे ‘रंग माझा वेगळा’ सुरांनी बहरलेला मराठी, हिंदी गीतांचा कार्यक्रम सादर करणार आहेत. मंगळवार, दि.२६ सप्टेंबर रोजी १८०० प्रयोगांचा टप्पा पार केलेला सलील कुलकर्णी व संदीप खरे (मुंबई) यांचे ‘आयुष्यावर बोलू काही....’ यांचा प्रयोग होणार आहे. बुधवार, दि.२७ सप्टेंबर रोजी हास्यसम्राट अजितकुमार कोष्टी ‘चला हसुया’ हसण्याचा कार्यक्रम संपन्न होणार आहेत.

तसेच दि.२३ ते २७ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी १० ते सायं.६.३० वाजेपर्यंत ‘पुस्तक प्रदर्शन व विक्री’ प्रियदर्शिनी मंगल कार्यालयाच्या पहिल्या मजल्यावर विविध प्रकाशकांची नामांकित पुस्तकांचे प्रदर्शन व विक्रीसाठी पुस्तके ठेवण्यात आली आहे. अक्कलकोट शहर ग्रामीण भागातील रसिक श्रोत्यांनी बौध्दिक व्याख्यानमाला व पुस्तक प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन विवेकानंद प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले आहेत.



## ✻ सुविचार ✻

नास्तिक मनुष्य हा आस्तिक मनुष्याइतकाच धार्मिक असतो.

## संपादकीय

### गडकरींचे वक्तव्ये चमकदार

गडकरी यांच्या घोषणा आणि वक्तव्ये चमकदार असतात. त्यात कधी मोठा दिलासा असतो, तर कधी मोठे इशारेही असतात. अलीकडेच त्यांनी असाच एक इशारा दिला आणि त्यातून मोठाच घोळ झाला. तो निस्तरताना त्यांना तत्काळ माघारही घ्यावी लागली आहे. सरकारच्या एकूणच धरसोडवृत्तीचा नमुनाही त्यातून बघायला मिळाला आहे. दिल्लीतील एका कार्यक्रमात ते म्हणाले की, आता डिझेल वाहनांना तुम्ही बाय ऽ बाय करा, अन्यथा आम्ही डिझेल वाहनांवर इतका कर वाढवू की वाहन उत्पादक कंपन्यांना गिऱ्हाईकही मिळणे मुश्कील होईल. डिझेलमुळे प्रचंड प्रदूषण होते, त्याच्या आयातीवरही मोठा खर्च होतो. त्यामुळे डिझेल वाहनांवर आणि डिझेलवर चालणाऱ्या जनरेटर सेटवर प्रदूषण कर म्हणून दहा टक्के अतिरिक्त जीएसटी लागू करण्याची शिफारस आपण करणार आहोत आणि तसे पत्र आजच आपण अर्थमंत्र्यांना देणार आहोत, असे ते म्हणाले होते. त्यांच्या या इशाऱ्याने वाहन उद्योगक्षेत्रात मोठी खळबळ उडाली. शेअर बाजार अशा स्वरूपाच्या संवेदनशील घोषणांना तत्काळ प्रतिसाद देतो. त्यानुसार गडकरींच्या घोषणेनंतर वाहन उत्पादक कंपन्यांचे विशेषत: डिझेलवरील वाहनांचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांचे शेअर्स कोसळायला सुरुवात झाली. त्याची मात्र, तातडीने दखल घेत गडकरींनी सारवासारव केली आणि असा कोणता प्रस्ताव तातडीच्या विचारार्थ नाही, असे घूमजावही केले. या प्रकारातून आणखी एक बाब लगेच ध्यानात येते, ती म्हणजे उद्योगपतींना झळ बसणाऱ्या घोषणांवर सरकार लगोलग तत्परतेने प्रतिसाद देते आणि घूमजावही करते. पण शेअर बाजारातून आज ही प्रतिक्रिया आली नसती आणि त्यांनी डिझेलवरील वाहनांवर अतिरिक्त दहा टक्के जीएसटी लागू करण्याच्या प्रस्तावाचे पत्र अर्थमंत्र्यांना दिले असते तर त्याचा महागाईवर काय परिणाम झाला असता त्याचा त्यांनी जराही विचार केला नव्हता. डिझेल वाहनांवर अतिरिक्त जीएसटीमुळे ही वाहने महाग तर झाली असतीच; पण त्यामुळे देशातील एकूणच मालवाहतुकीचा दर वाढला असता. देशातील मालवाहतूक करणारी बहुतांशी म्हणजे ८० टक्के वाहने डिझेलवर आहेत. त्यांच्यासाठी हा निर्णय फारच घातक ठरला असता. डिझेल वाहनांवर अतिरिक्त दहा टक्के कराचा प्रस्तावही तसा अवाजवीच होता. विजेवर चालणाऱ्या वाहनांसाठी अजूनही देशात पुरेशी सोय नाही. लांब पल्ल्यात मालवाहतूक करणारी वाहने विजेवरची असणेही अपुऱ्या चार्जिंग स्टेशन्समुळे खात्रीशीर म्हणता येईल असा पर्याय नाही.

## वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेच्या माध्यमातून चारुशीला पाटील यांची बालवाडी सुरू

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेच्या माध्यमातून मराठी महिला चारुशीला पंकज पाटील यांना १० लाख रुपयांचे कर्ज मिळाले असून त्यांनी पुणे शहरातील साळुंके विहार येथे मुलांसाठी कांगारू आंतरराष्ट्रीय इंग्रजी माध्यम बालवाडी (प्री-स्कूल) सुरू केली आहे. या योजनेमुळे त्यांना स्वत:च्या आवडीचे करिअर करण्याची संधी मिळाली आहे.




चारूशीला पाटील यांचे लहानपणापासून स्वतःच्या पायावर उभ रहाण्याचे स्वप्न होते. त्यांनी सर्वसामान्यपणे आखलेल्या चौकटीच्या बंधनात न राहता एम.एस्सी, बायो टेक्नोलॉजीपर्यंत शिक्षण पूर्ण केले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना पुणे विद्यापीठात मायक्रो बायोलॉजी विभागात समन्वयक आणि प्रकल्प सहाय्य म्हणून नोकरी मिळाली. नोकरी चांगली होती. वेतनही व्यवस्थित होते. तरीही त्यांना स्वतःचे क्षेत्र निवडून त्यात यशस्वी व्हायचे होते.

स्वत:च आवडीचं करिअर किंवा व्यवसाय सूरू करायच म्हटलं की सर्वात मोठा प्रश्न उभा राहतो तो म्हणजे भांडवलाचा. याच समस्येमुळे चारुशीला यांना पुढे जाता येत नव्हते. त्यांनी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनेबाबतची माहिती घेऊन पुणे येथील जिल्हा कार्यालयाला भेट दिली. तेथे त्यांना वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेविषयी मार्गदर्शन मिळाले. कर्ज प्रक्रियेत त्यांना कुटुंबातील सदस्यांकडूनही प्रोत्सहान मिळाले.

चारुशीला यांना वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेअंतर्गत वाई अर्बन को-ऑपेराटीव्ह बँकेतून १० लाख रूपयांचे कर्ज मंजूर झाले. कर्जाच्या रकमेतून त्यांनी. शालोपयोगी साहित्य खरेदी केले. पुण्यातील साळुंखे विहार येथे त्यांनी बालवाडी (प्री-स्कूल) शाळा सुरू केली. या शाळेत साधारण १४ कर्मचारी कामाला असून त्यांनाही यानिमित्ताने रोजगार मिळाला आहे. श्रीमती पाटील यांची इच्छा तर पूर्ण झालीच पण इतरांना देखील रोजगार मिळाला याचे एक वेगळेच समाधान त्यांना मिळत आहे. श्रीमती पाटील कर्जाचा हफ्ता न चुकता भरत असून त्यांना योजनेचा व्याज परतावा वेळेवर मिळत आहे.

वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेच्या माध्यमातून बँकेने १० लाख रूपयांपर्यंतच्या मर्यादेत कर्ज मंजूर केलेल्या उमेदवाराने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास त्यातील व्याजाची रक्कम (१२ टक्केच्या मर्यादित) त्यांच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येते. ही योजना संपूर्णपणे संगणीकृत असून प्रक्रीया सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) अथवा तत्सम संगणक प्रणालीद्वारे राबविण्यात येते. योजनेकरिता एकूण प्रस्तावित निधीच्या किमान ४ टक्के निधी दिव्यांगांसाठी (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने त्यांच्या अधिसूचनेत नमूद केलेल्या दिव्यांगांच्या व्याख्येनुसार) राखीव ठेवण्यात येतो.

योजनेचा लाभ घेण्यासाठी उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असावा. लाभार्थ्याचे कर्ज खाते आधारकार्ड लिंक असावे. वय वर्ष १८ ते ४५ या दरम्यान असावे. लाभार्थ्यांचे प्रमाणित वार्षिक कौटुंबिक उत्पन्न सक्षम प्राधिकरणाने वेळावेळी दिलेल्या प्रमाणपत्रानुसार असावे. दिव्यांग उमेदवाराकडे सक्षम यंत्रणेने दिलेले प्रमाणपत्र असावे. कृषी, संलग्न व पारंपारिक उपक्रम, लघु व मध्यम उद्योग व सेवा क्षेत्र ही प्रकल्पाची क्षेत्र असून महाराष्ट्र राज्यातीलच असावेत. उमेदवाराने अर्ज करतेवेळी या प्रकल्पासाठी व यापूर्वी महामंडळाच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

उमेदवार कोणत्याही बँकेचा /वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा. उमेदवाराने कर्ज प्रकरण हे सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली अथवा तत्सम संगणक प्रणालीद्वारे प्रकरण हाताळण्यास सक्षम असलेल्या बँकेत केलेले असवे. एकावेळी केवळ एकदाच या योजनेचा लाभ घेता येईल. उमेदवारांनी शासनाच्या अधिकृत वेबपोर्टलवर अर्ज सादर करणे आवश्यक असेल. प्रस्ताव सादर केल्यावर दिलेल्या अटी व शर्तीनुसार प्रस्ताव पात्र ठरत असल्यास उमेदवारांस संगणीकृत सशर्त हेतूपत्र (लेटर ऑफ इंटेन्ट) /मंजूरीपत्र दिले जाईल. उमेदवाराने या आधारे बँकेकडून प्रकरणावर कर्ज मंजूर करून घ्यावे. लाभार्थ्यांने ऑनलाईन पोर्टलवर उद्योग सुरू असल्याचे किमान दोन फोटो अपलोड करणे आवश्यक आहे.

**-जिल्हा माहिती कार्यालय, पुणे**

## पंढरपूर तालुका पोलिसांची मोठी कारवाई

### सहा वर्षापासून खून करून फरार झालेल्या आरोपीला अखेर जेरबंद केले

पंढरपूर/प्रतिनिधीः मौजे गाडी तालुका पंढरपूर येथील भागुबाई भाऊसा अडगळे वय ३५ वर्षे चापती भाऊसाहेब भानुदास आडगळे यांनी त्यांच्या पत्नीवर चारित्र्याच्या संशयावरून तीस कोयत्याने मारहाण करून जबर जखमी केले तेच ठार केले आहे या मताची आई सोडवण्यात आली असता तिलाही आरोपीने कोयत्याने वार करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे श्री दादू मारुती केजळे वय ५७ वर्षे व राहणार पळशी तालुका पंढरपूर यांनी दिलेल्या फिर्यादीमध्ये येथे गुन्हा रजिस्टर नंबर ४४५/ २०१६ भात वि कलम ३०२.३०७ आणि गुन्हा दाखल झाला आहेसदर गुन्ह्यातील आरोपी नामे




भाऊसाहेब भानुदास आडगळे राहणार गाडी तालुका पंढरपूर हा गुन्हा घडल्यापासून मागील सहा वर्षापासून शोध घेणे कामे मा उपविभागीय पोलीस अधिकारी सो अर्जुन भोसले व पोलीस निरीक्षक श्री मिलिंद पाटील सो यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस ठाणे कडील अंमलदार यांना योग्य सूचना देऊन सदर आरोपीचा शोध घेणे कामे आदेश केले होते पंढरपूर तालुका पोलीस ठाणे कडील पोलिस अंमलदार व त्यांचा शोध घेत होते परंतु तो मिळून येत नव्हता. दिनांक १६ सप्टेंबर रोजी पंढरपूर तालुका पोलीस ठाण्याचे अंमलदार यांच्या गोपनीय बातमीदारांवरून मार्फत बातमी मिळाली की आरोपी नामे भाऊसाहेब आडगळे हा गार्डी गावामध्ये आला आहे गोपनीय बातमीच्या आधारे अंमलदार यांनी गार्डी येथे जाऊन आरोपीस पकडून पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन मध्ये आणून तापसी का अधिकारी यांच्या ताब्यात दिली सदरची कामगिरी ही श्री श्री देशपांडे सो पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण श्री हिम्मत जाधव सो अप्पर पोलीस अधिकारी सोलापूर ग्रामीण डॉक्टर अर्जुन भोसले शो उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग व पंढरपूर तालुका वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मिलिंद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवलदार शेख पोलीस नाईक सज्जन भोसले हनुमंत शिंदे यांनी केले असून त्याबाबत पुढील तपास पोसई श्री घाडगे पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हे करीत आहेत

पान १ वरुन

## मराठवाड्याच्या शाश्वत विकासाला..

जलसंधारणाच्या माध्यमातून कायमस्वरुपी तोडगा काढण्याबरोबरच सिंचनाचे ग्रीड, लहान लहान साखळी धरणांची निर्मिती, वातावरण अनुकूल पिकांची शिफारस, कोल्ड स्टोरेजेस तयार करुन शेतीमालाचे मूल्यवर्धन करण्यावर भर देण्यात येत आहे. शाश्वत सिंचनाची हमी असलेल्या जलयुक्त शिवार अभियाना टप्पा २ प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. कृषी प्रक्रिया उद्योगाला चालना देण्यासाठी मराठवाड्यात उद्योग स्थापन करण्यासाठी उद्योगाला विशेष सवलती देण्यात येत आहेत. मराठवाडा एज्युकेशन व मेडीकल हब बनविण्यासाठीही चालना देण्यात येत असल्याचेही मुख्यमंत्री श्री शिंदे म्हणाले.

महिला सक्षमीकरणासाठी शासनाने अनेक उपक्रम, योजना राबविल्या आहेत. शासनाने अनेक प्रलंबित प्रकल्पांना गती देण्याचे काम केले. असे नमूद करून मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, महिलांना एसटीत ५० टक्के सवलत, ज्येष्ठांना मोफत प्रवास, शेतकऱ्यांना नमो सन्मान योजनेत वर्षाला १२ हजार रूपयांची मदत दिली जात आहे. एक रूपयात पीक विमा क्रांतीकारी योजना आहे. शासनाने एनडीआरएफच्या निकषापेक्षा जास्त मदत शेतकऱ्यांना दिली आहे. नैसर्गिक आपत्ती पूर्व सूचना देणारे सॅटेलाईट शासन उभारणार आहे. यावर्षी पाऊस कमी पडला ही वस्तुस्थिती आहे. मात्र सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे. जी-२० परिषदेत भारताचा ठसा उमटविण्याचे काम प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले. शासनाने ३५ जल सिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिली असून त्यामुळे ८ लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे, असेही मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी सांगितले.

मराठवाडा मुक्ती संग्राममध्ये स्वामी रामानंद तीर्थ यांचे योगदान, त्यांच्या कार्याचा सन्मान म्हणून दिल्ली येथील महाराष्ट्र सदन येथे त्यांचा पुतळा उभारण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करण्याबरोबरच शहरातील सुमारे ३०० वर्ष पूर्वीच्या तीन पूलांच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असेही मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी यावेळी सांगितले.

आपले सण, उत्सव पुढे नेण्याचे काम मंडळामार्फत करण्यात येते. राज्यातील सण, उत्सव गुण्यागोविंदाने व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त करत गणेश मंडळांना पुढील पाच वर्षासाठी परवानगी देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचेही मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, मराठवाडा मुक्तिसंग्रामा'च्या अमृत महोत्सवी वर्षाची ही सांगता असली तरी हा शेवट नसून शतक महोत्सवी वर्षाकडे विकसित मराठवाड्याची सुरुवात आहे. या निमित्ताने होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात येणाऱ्या निर्णयामुळे मराठवाड्याच्या विकासाला चालना मिळण्यास मदत होईल. यानिमित्ताने होणाऱ्या निर्णयांची प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी समन्वयाने कामे करुन मार्गी लावावीत. मराठवाड्यात लघु मध्यम मोठे प्रकल्प, जलसंधारणाचे प्रकल्प राबवून लाखो हेक्टर जमीन ओलिताखाली आणण्याच्या प्रयत्न आहे. समुद्राकडे वाहून जाणारे पावसाचे पाणी गोदावरी खोऱ्याकडे वळवून मराठवाडा दुष्काळमुक्त करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

गुजरातकडे जाणारे अतिरिक्त पाणी राज्यासह गोदावरी नदीच्या खोऱ्यात वळवून येत्या काळात मराठवाड्याला उपयोग करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. नदीजोड प्रकल्प वेगाने मार्गी लावण्याचा पर्यंत करण्यात येत आहे. येत्या काळात असे १०४ प्रकल्प पूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न असुन राज्यातील अवर्षणप्रवण भागासाठी २० हजार कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली असल्याचेही ते म्हणाले.

राज्यात रस्ते, रेल्वे, गर्दीच्या ठिकाणी मेट्रो, प्रत्येक जिल्ह्यात विमानतळ झाले पाहिजे, शेतकऱ्यांना बी-बियाणे, खते, शेतीला पाणी, शेतमालाला चांगला भाव पाहिजे यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. राज्यात गुंतवणूक वाढवून तरुणांना रोजगार , महिलांना समान संधी, विकासामध्ये त्यांना वाटा मिळाला पाहिजे, त्यांना मान सन्मान मिळाला पाहिजे यासाठी काम करण्यात येत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

मराठवाडाच्या मातीने संत, महात्मा, समाजसुधारक, साहित्यिक, कलावंत, विचारवंत दिले याचा रास्त अभिमान असल्याचे सांगत मराठवाड्यात सांस्कृतिक, अध्यात्मिक, लेणी, भुईकोट किल्ले, पारंपरिक लोककला, खाद्यसंस्कृती तसेच पाहुण्याचा आदरातिथ्य करणारा भाग असून या पर्यटन स्थळावर लक्ष केंद्रित करुन पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा काम करण्यात येत आहे.

मराठवाड्याचा कल्याणासाठी, समृद्धीसाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करण्याचे आवाहनही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी केले.

मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृत महोत्सवी सांगता वर्षानिमित्त स्वामी रामानंद तीर्थ यांचे योगदान, त्यांच्या कार्याचा सन्मान म्हणून दिल्ली येथील महाराष्ट्र सदन येथे पुतळा उभारण्याची व त्याचबरोबर शहरातील सुमारे ३०० वर्ष पूर्वीच्या तीन पूलांच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची विनंतीही त्यांनी यावेळी मुख्यमंत्र्यांकडे केली.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात महापालिका आयुक्त जी. श्रीकांत म्हणाले, छत्रपती संभाजी नगर शहरात विविध विकास कामे सुरु आहेत. आगामी काळात सुमारे २ हजार कोटी रुपयांची विकास कामे प्रस्तावित आहे. त्यानुसार कामे करण्यात येतील, असेही ते म्हणाले.

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सातारा व देवळाई परिसरातील मलनि:स्सारण योजनांचे ई भूमीपुजन, हर्सूल येथील घनकचरा प्रक्रिया केंद्राचे ई लोकार्पण, महानगरपालिकेच्या एज्युकेशन कंट्रोल रूमचे उद्घाटन, औरंगाबाद येथील विविध रस्त्यांचे काँक्रिटीकरण करण्याच्या कामाचा शुभारंभ, नागरिकांच्या सार्वजनिक वापरासाठी आकांक्षिक स्वच्छतागृह बांधण्याच्या भूमिपूजन, कांचनवाडी येथील अग्निशमन केंद्र इमारतीचे लोकार्पण, हिंदू हृदय सम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उद्यान, बोटॅनिकल गार्डन येथील विकास कामे, महानगरपालिकेने खरेदी केलेल्या विविध यंत्रासामुग्रीचे लोकार्पण, हिंदू-हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्याचे लोर्कापणही यावेळी करण्यात आले.

सांस्कृतिक कार्य विभागामार्फत कॉफी टेबल बुक, गॅझेटियर, डॉक्युड्रामा फिल्म व पोस्टल कव्हर विमोचनही यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास पदाधिकारी, अधिकारी यांच्यासह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

## पंतप्रधान मोदींच्या हस्ते आज ..

खेळणी बनवणारे, टोपल्या/चटया /झाडू बनवणारे / काथ्यापासून वस्तू बनवणारे, कुंभार, चांभार, शिल्पकार, पाथरवट (दगड फोडणारे), कुंभार, सोनार, कुलूप, हातोडी आणि टूलकिट बनवणारे, लोहार, सुतार, होडी बनवणारे इत्यादींचा समावेश आहे. लघुउद्योग आणि मत्स्यव्यवसाय क्षेत्राच्या विकासामध्ये होड्या आणि बनवणाऱ्यांची भूमिका महत्वपूर्ण असून ते आपल्या मासेमारी उद्योगाच्या सुरळीत कामकाजात मोठी भूमिका बजावतात आणि भारतीय सागरी मत्स्यव्यवसायाचा कणा म्हणून काम करतात. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय हे पंतप्रधान विश्वकर्मा योजनेचे नोडल मंत्रालय आहे.

## ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या उभारणीत..

हायड्रोजन धोरण जाहीर केले आहे. त्यामध्ये पाच वर्षांच्या कालावधीसाठी १९ हजार ७४४ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. याचबरोबरीने एकात्मिक बायोमास एनर्जी कार्यक्रमाचा समावेश असलेल्या साखर कारखान्यांवर आधारित बगॅस सहनिर्मितीचा सरकारने गांभीर्याने विचार केला पाहिजे.

यावेळी व्यासपीठावर कोजनरेशनचे उपाध्यक्ष जयप्रकाश दांडेगावकर, महासंचालक संजय खताळ, दूधगंगा-वेदगंगा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष के. पी. पाटील, राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे अध्यक्ष पी. आर. पाटील आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात राष्ट्रीय पातळीवरील को-जनरेशन पुरस्कार प्रदान करण्यात आले. यंदा या पुरस्कारांचे दुसरे वर्ष असून सहवीज निर्मिती प्रकल्पांना संस्थात्मक तसेच वैयक्तिक पातळीवर अधिकाऱ्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी हायड्रोजन इंडिया या नियतकालिकाचे प्रकाशन करण्यात आले.

## लिबियामध्ये धरण फुटून..

लिबियात सर्वत्र चिखलाचं साम्राज्य पसरलं आहे, त्याखाली मृतदेहांचा खच पडला आहे. डेरना शहरातील जे लोक महापुरातून वाचले, त्यांचं पुनर्वसन करण्यात आलं आहे. हा महापूर इतका भयंकर होता की मृतदेह शोधणं कठीण झालं आहे. संपूर्ण शहर जलमय झाल्याने डोंगराळ भाग खोदून उंचावर मृतदेह पुरले जात आहेत. मृतदेह सडत असल्याने तात्काळ त्यांचं दफन करण्यात येत आहे. चिखलात खचलेले मृतदेह पाहून लोक घाबरले आहेत.

डेरना शहरात युगोस्लाव्हियाच्या कंपनीने १९७० मध्ये दोन धरणं बांधली होती. पहिलं धरण ७५ मीटर उंच होतं, ज्यात १.८० कोटी क्युबिक मीटर पाणी साठवलं जात होतं. तर दुसरं धरण ४५ मीटर उंच होतं, ज्यात १५ लाख क्युबिक मीटर पाणी साचत होतं. प्रत्येक क्युबिक मीटर पाण्यात एक टन वजन असतं, त्याप्रमाणे दोन्ही धरणात सुमारे २ कोटी टन पाणी होतं. या धरणांना लागूनच खाली डेरना शहर वसवलेलं होतं. लिबियातील काही भागात डॅनियल वादळामुळे एक आठवडा अतिवृष्टी झाली. वादळामुळे झालेल्या पावसात ही दोन्ही धरणं पूर्ण क्षमतेनं भरली. त्यात ही दोन्ही धरणं सिमेंटने बांधण्यात आली होती. वादळामुळे धरणांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त पाणी भरलं, धरण ओव्हरफ्लो झालं. धरणाची वेळोवेळी देखभाल न केल्यामुळे त्याचं बांधकाम देखील मजबूत नव्हतं आणि त्यामुळे ते अचानक फुटलं. धरणं फुटून त्याखाली वसलेलं संपूर्ण डर्ना शहर वाहून गेलं

## 'काँग्रेसची सत्ता आली तर ..

वडेट्टीवारांनी संभाजी भिडेंचा समाचार घेतला. तसेच महापुरुषांचा अपमान करणाऱ्यांना महाराष्ट्र कधीही माफ करणार नसल्याचं देखील त्यांनी म्हटलं आहे. यावर बोलांताना वडेट्टीवारांनी म्हटलं की, 'काँग्रेसची सत्ता आली तर संभाजी भिडे यांना तुरुंगात टाकू.' महाराष्ट्राचं सरकार हे तीन रिमोटवर चालत असल्याचं म्हणत वडेट्टीवार यांनी राज्यसरकारवर निशाणा साधला. पुढे बोलतांना त्यांनी म्हटलं की, 'राज्याच्या तिजोरीची सध्या लूट सुरु आहे. फक्त सत्ताधारी आमदारांचाच विकास सुरु आहे. समान्य नागरिक यापासून वंचित राहतोय.' सध्या राज्यभरात आरक्षणाच्या मुद्द्यावरुन वातावरण चांगलचं तापलं असल्याचं पाहायला मिळत आहे. मराठा, ओबीसी, धनगर समाजाकडून आरक्षणासाठी राज्याच्या विविध भागामध्ये आंदोलनं करण्यात येत आहेत. याच मुद्द्यावर वडेट्टीवार यांनी देखील भाष्य केलंय. यावर बोलतांना त्यांनी म्हटलं आहे की, 'सर्वांचं आरक्षण हे धोक्यात आलं आहे. कंत्राटी भरतीच्या कायद्यामुळे सर्वांच्या आरक्षणाचा भविष्य हे अंधरात आहे. त्यामुळे यासाठी प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जाऊन आंदोलनं करा. सरकारचा निषेध करा,पण हा जीआर मागे घ्यायला सांगा.' ही कंत्राटी भरती आरक्षणाच्या मुळावर उठणार असल्याचा दावा देखील वडेट्टीवार यांनी केलाय. कंत्राटी कायदा रद्द करण्यात यावा अशी आमची भूमिका असल्याचं वडेट्टीवार यांनी स्पष्टीकरण दिलंय.

## अजिबात हुशारी करु नका! गणेशोत्सवादरम्यान पुण्यात ७ हजार पोलीस तैनात

पुणे : गणेशोत्सवादरम्यान शहरात कायदा व सुव्यवस्था (झींपश सरपशीहेंीरीं २०२३) राखण्यासाठी ७ हजार पोलीस कर्मचारी तैनात करण्यात येणार आहेत. पुणे पोलिसांनी संभाव्य दहशतवादी हल्ले आणि अनपेक्षित घटना लक्षात घेऊन बंदोबस्ताचे नियोजन केले आहे. समृद्ध इतिहास असलेल्या गणेशोत्सवाला १९ सप्टेंबरपासून सुरुवात होत असून उत्सवादरम्यान शहर आणि उपनगरात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.उत्सवादरम्यान, राज्य आणि देशाच्या इतर भागातून अनेक पर्यटक शहराला भेट देतात. शहराच्या मध्यवर्ती भागातील गर्दी लक्षात घेऊन पोलिसांनी बंदोबस्ताचे नियोजन केले आहे. मोबाईल, दागिने चोरीच्या घटना रोखण्यासाठी साध्या वेशातील पोलीस तैनात करण्यात येणार आहेत. पोलिस आयुक्तालयातील पाच हजार पोलिस, अधिकारी, क्विक रिस्पॉन्स टीम, गुन्हे शाखेचे पथक, पुण्याबाहेरून आलेले १३०० व पोलिस कर्मचारी, होमगार्डचे एक हजार जवान, सीआरपीएफच्या पाच तुकड्या तैनात असतील.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

## गणेशोत्सवाच्या अनुषंगाने तीन दिवस मद्यविक्री अनुज्ञप्ती बंद

पुणे : गणेशोत्सव कालावधीत शांतता सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने जिल्ह्यातील किरकोळ मद्यविक्रीच्या सर्व अनुज्ञप्ती १९ आणि २८ सप्टेंबर रोजी बंद राहतील. तसेच २९ सप्टेंबर रोजी पुणे महानगरपालिका क्षेत्रात विसर्जन मिरवणूक संपेपर्यंत विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावरील आणि गणेशोत्सवाच्या पाचव्या व सातव्या दिवशी गणपती विसर्जन असलेल्या क्षेत्रात मद्यविक्रीच्या अनुज्ञप्ती बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख यांनी दिले आहेत.

पुणे जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र मद्य निषेध अधिनियम, १९४९ मधील नियम - १४२ अन्वये किरकोळ मद्यविक्रीच्या सर्व अनुज्ञप्ती (एफएल-२, एफएल-३, सीएल-३, एफएलबीआर-२, फॉर्म-ई, फॉर्म-ई-२ व ट. ड.-१ बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. १९ सप्टेंबर व २८ सप्टेंबर दोन्ही पूर्ण दिवस पूर्ण पुणे जिल्हा, २९ सप्टेंबर रोजी विसर्जन मिरवणूक संपेपर्यंत पुणे महानगरपालिका क्षेत्रातील विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावरील सर्व मद्यविक्री अनुज्ञप्ती तसेच गणेशोत्सवाचा पाचवा व सातवा संपूर्ण दिवस ज्या भागात पाचव्या व सातव्या दिवशी गणेश विसर्जन होते अशा भागातील अनुज्ञप्त्या बंद ठेवाव्यात. याशिवाय ज्या-ज्या ठिकाणी सार्वजनिक गणपती विसर्जन मिरवणुका असेल, त्या-त्या ठिकाणी विसर्जन मिरवणुक मार्गावरील सर्व भागातील मद्य विक्रीच्या अनुज्ञप्ती विसर्जन मिरवणुकीच्या दिवशी बंद ठेवाव्यात. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या अनुज्ञप्तीधारकाविरुद्ध महाराष्ट्र मद्य निषेध अधिनियम, १९४९ व त्याअंतर्गत असलेल्या नियमातील तरतुदीनुसार कडक कारवाई केली जाईल, असेही आदेशात नमूद आले आहे.

## व्यसनमुक्त भारत करण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा : मारुती बनसोडे




नळदुर्ग : आपल्या देशात व्यसनाधीनतेचे प्रमाण दिवसेन दिवस वाढत असून युवा पिढी व्यसनाधीन होताना दिसत आहे व या व्यसनाधीनता अनिष्ट परिणाम होत असून युवकांचे जीवन धोक्यात येत आहे त्यासाठी आता युकानी व्यसनमुक्त होऊन भारत व्यसन मुक्त करण्यासाठी आता पुढे आले पाहिजे असे आवाहन उस्मानाबाद जिल्हा नशा बंदी मंडळाचे जिल्हा संघटक मारुती बनसोडे यांनी केले आहे.

टाटा सामाजिक विज्ञान संस्था तुळजापूर, येडाई व्यसनमुक्ती उपचार व समुपदेशन केन्द्र येरमाळा आणि परिवर्तन सामाजिक संस्था नळदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने धारुर ता. जि.उस्मानाबाद येथे व्यसनमुक्ती या विषयावर जाहीर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते यावेळी नशा बंदी मंडळ महाराष्ट्र राज्य चे उस्मानाबाद जिल्हा संघटक मारुती बनसोडे प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे लोकप्रीय सरपंच मा. बालाजी पवार हे होते. तर प्रमुख उपस्थिती मध्ये उपसरपंच पांडुरंग लोहार, समाज सेवक श्री खांडेकर सर, सुनील शिंदे पोलिस पाटील इत्यादी उपस्थित होते. पुढे बोलताना मारुती बनसोडे म्हणाले की दारुमुळे आपल्या देशात दरवर्षी १०ते १३ लाख मरतात. पुरुषांमध्ये अमली पदार्थांच्या सेवनामुळे १५ टक्के मृत्यू होतात. तंबाखूमुळे तोंडाचे कॅन्सर होतो तर गुटखा खणाऱ्याला हार्ट अटॅक येतो. शिगारेट ओढणाऱ्याला फुफ्फुसाचा कॅन्सर होतो. दारुच्या व्यसनामुळे भारतात १८ टक्के मर्डर होतात.१८ सुसाईड होतात. ३४ टक्के दारुमुळे मृत्यू होतात. १५ टक्के दारूला स्पर्श करणारे फसतात, १७ टक्के गांजाला स्पर्श करणारे फसतात. १५ टक्के तंबाखूला स्पर्श करणारे फसतात . जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवाला मध्ये ही आकडेवारी जाहीर करण्यात आली आहे. यासाठी आता युवकांनी व्यसनाचा धोका समजून घ्यावा व यापासून दूर राहावे असे आवाहन मारुती बनसोडे यांनी केले आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी टाटा सामाजिक संस्था तुळजापूर चे इडथ चे विद्यार्थी आयुष राऊत, शुभम , दीक्षा, निधी, रिशव, जिशान यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमास गावातील बचत गटांच्या महिला, नागरीक, युवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## वागदरी परमेश्वर आराधना पर्व पालखी महोत्सव गुरूवार पासुन प्रारंभ




वागदरी/प्रतिनिधी : येथील ग्रामदैवत श्री परमेश्वर आराधना पर्व पालखी महोत्सव दि,२१ सप्टेंबर पासुन प्रारंभ होणार असुन, त्या निमित्त विविध धार्मिक व सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे माहिती आराधना पंचकमिटीच्या वतीने कळविण्यात आले आहे.

सालाबादाप्रमाणे या वर्षी देखील दि,२०रोजी सायंकाळी ७.३० वाजता कंटली पूजनाने पर्व उत्सवाला प्रारंभ होणार आहे, परमेश्वर आराधना पर्व पालखी महोत्सव प्रामुख्याने शेतकरी वर्गाचा सण म्हणुन प्रसिध्द आहे, खरीप हंगातील सर्व कामे उरकुन,रब्बी पेरणीची तयारी करून पर्व उत्सव साजरा करतात, वागदरी परमेश्वर पालखी झाल्यावरच या भागातील शेतकरी रब्बी पेरण्या सुरू करतात, दि२१. सप्टेंबर रोजी पहाटे चार वाजता श्री च्या मूर्ति स महाभिषेक केला जाता,सकाळी ११ वाजता म नि प्र शिवलिंग महास्वामी विरक्त मठ वागदरी, गुरुकुल भूषण श्री ष ब्र विश्वराध्य मळेंद्र शिवाचार्य हिरेमठ संस्थान अफझलपूर यांच्या दिव्य सानिध्यात अंबील घागरीची मिरवणुक गावातील प्रमुख मार्गावरून हनुमान मंदिर पासुन परमेश्वर मंदिर पर्यंत निघते, त्यानंतर उपस्थित मान्यवराच्या प्रवचन व धर्म सभा संपन् होणार आहे, या दिवशी कर्नाटक, महाराष्ट्र व मराठवाडा येथील विविध कलापथकांचे आगमान होणार रात्रभर कार्यक्रम संपन्न होणार आहे, दि, २२ रोजी दुपारी १२ वाजता सोलापूरचे खा डॉ जयसिध्देश्वर महाराज यांच्या अमृतहस्ते पालखीची महापूजा संपन्न झाल्यावर परमेश्वर मंदिरापासून श्री ची भव्य पालखी मिरवणुक गावातील व परगावहून आलेल्या सर्व कलापथकासह मिरवणुक निघणार, रात्री नऊ वाजता पालखी मंदिरात आल्यानंतर भाकणुक होऊन कार्यक्रमाची सांता होणार आहे, या पर्व महोत्सव ची प्रमुख वैशिष्टे म्हणजे अन्नदान व राष्ट्रीय एकात्मता होय, सर्व जाती धर्मातील लोक जातीभेद विसरून या कार्यक्रमात सहभागी हातात,तरी या पुण्य व पवित्र कार्यात सहभागी होऊन महाप्रसाद व दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन परमेश्वर पर्व पंचकमिटीच्या करण्यात आले आहे.

## शेवट श्रावणमास निमित्त श्री जागृत मारुती अन्नछत्र मंडळात भक्ताची गर्दी



अक्कलकोट/प्रतिनिधी : शेवट श्रावणमास निमित्त श्री जागृत मारुती अन्नछत्र मंडळात भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात दिसून आली.बोलो विर हनुमान की जय', जय जय बजरंगबली,आशा घोषणांनी गौडगांवच्या मारूती मंदीराचा परिसर शनिवारी दुमदुमून गेला होता. सोलापूरचे तुकाराम कोरडे श्याम सागट यांच्या वतीने अन्नछत्र मंडळात महाप्रसादाचे आयोजन केले होते.तर दुपारची काकड आरतीचा मान ज्योती (रेणुका) जाबा शेडम व महादेव झोळप्पा बिजापुरे ब्रऱ्हाणपुर यांना मिळाला.यावेळी शेकडो भाविकांनी टाळ्याच्या गजरात मारुतीचे दर्शन घेतले.श्रावण महिन्यातील शेवट शनिवार असल्याने भाविकांनी गौडगाव येथील दक्षिणमुखी जागृत मारुतीच्या दर्शनासाठी पहाटेपासुन मोठी गर्दी केली हाती.यावेळी शेकडो भाविक,भक्तांनी महापुजा, रुद्राभिषेक,होमहवन व आरतीमध्ये सहभागी झाले होते.श्री मारूतीच्या दर्शनासाठी आलेल्या भविकांनी मारूतीच्या गजरात शांततेत दर्शन घेत होते.मंदिर समितीच्या वतीने दर्शनाची सुलभ केली होती.

अन्नछत्र मंडळात महाप्रसाद देणाऱ्या तुकाराम कोरडे व श्याम सगट यांचा सत्कार अन्नछत्र मंडळाच्या वतिने करण्यात आला.महाप्रसादाच्या रूपात अन्नदान केल्यास पुण्य प्राप्त होत असते.अशी भाविकांची श्रद्धा आहे.मनातील इच्छा व मनोकामना पूर्ण झालेल्या भक्तांकडून दर शनिवारी महाप्रसाद दिले जाते . शेवट श्रावण शनिवारी मारुतीच्या दर्शनासाठी राज्य, परराज्यातुन आलेल्या हजारो भाविकांनी शांततेत श्री मारुतीचे दर्शन घेतले.यावेळी अध्यक्ष श्रीकांत खानापुरे,सिद्राम वाघमोडे,प्रकाश मेथें,भारत ननवरे,चौडप्पा सोलापूरे,बिरप्पा पुजारी,परमेश्वर सुतार,ज्ञानेश्वर फुलारी, शांतया स्वामी श्रीमंत म्हेत्रे, श्रीमंत सावळतोट, प्रकाश सनकळ,अमसिद्ध कोरे यांच्यासह देवस्थानचे विश्वस्त व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पंढरपूर येथे आमदार समाधान आवताडे यांच्या माध्यमातून माँसाहेब जिजाऊ स्मारक संदर्भात विचार विनिमय बैठक संपन्न

### जिजाऊ स्मारक बांधकामास लवकरच सुरुवात होणार

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर येथील माँसाहेब जिजाऊ स्मारक जिजाऊ सृष्टी उभारणे हा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित होता याविषयी आमदार समाधान आवताडे यांनी जिजाऊ स्मारक आणि जिजाऊ सृष्टी उभारणी करणे साठी एक कोटी निधी मंजूर करून दिला आहे या संदर्भात स्मारक कसे असावे याबाबत आमदार आवताडे यांनी प्रांत अधिकारी गजानन गुरव, तहसीलदार सुशील बेल्हेकर, नगरपरिषद मुख्याधिकारी अरविंद माळी,मराठा संघटनेचे पदाधिकारी व बहुजन समाज बांधव यांच्या समवेत विचार विनिमय बैठक घेतली पंढरपूर ही आध्यात्मिक नगरी असून विठुरायाचे दर्शन घेण्याकरिता महाराष्ट्रातून व इतर राज्यातून अनेक भाविक दर्शनासाठी पंढरपुरात येत असतात दर्शनासाठी येणाऱ्या नागरिकांसाठी गजानन महाराज,मठ कैकाडी महाराज मठ व तुळशी वृंदावन या ठिकाणी येणारा भाविक विरंगुळा करणे करिता जात असतो जर माँसाहेब जिजाऊ सृष्टी उभारली गेली तर येणाऱ्या भाविकांना माँसाहेब व छत्रपती शिवाजी महाराज यांची चरित्र व विचार पुढील पिढीस नक्कीच मिळणार आहेत या गोष्टीचा विचार करून हेच स्मारक भव्य दिव्य करण्याचा संकल्प आमदार आवताडे यांनी घेतला असून हे काम लवकरात लवकर सुरू करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यास दिले आहेत

यावेळी आमदार आवताडे यांनी उपस्थितांची मते विचारात घेतली असून या स्मारकामध्ये कोणत्या गोष्टी समाविष्ट करण्यात याव्यात हे स्मारक कसे असावे याविषयी विचार विनिमय केले आमदार आवताडे बोलताना असे म्हणाले की या स्मारकास एक कोटी निधी दिला असून पुढील जो निधी लागेल तो मी कमी पडू देणार नाही व त्याचबरोबर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुतळ्याचे सुशोभीकरण व पंढरपूर शहरातील असलेल्या सर्व महापुरुषांच्या पुतळयांचे सुशोभीकरण करण्यास मी तत्पर आहे असे आमदार आवताडे म्हणाले तसेच पुढील काळात माँसाहेब जिजाऊचे स्मारक तयार झाल्यास या अध्यात्मिक नगरीचे वैभव आणखी जोमाने खुलणार आहे.

## जलसंपदाच्या बैठकीत तिसंगी तलावामध्ये पाणी सोडण्याची आ.आवताडे यांची मागणी

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघामध्ये यंदा पावसाने अपेक्षेप्रमाणे हजेरी न लावल्याने आमदार मा.श्री.समाधानदादा आवताडे साहेब यांनी पुणे येथील जलसंपदा विभागाच्या बैठकीमध्ये तिसंगी तलावामध्ये पाणी सोडण्याची मागणी केली असता संबंधित विभागाकडून ४ सप्टेंबर पासून सोडण्याचे आदेश पारित करण्यात आले आहेत.

हे पाणी सुटल्यानंतर मतदारसंघातील रांझणी,अनवली,एकलासपूर, कासेगाव,तावशी,तनाळी,खर्डी, शेटफळ,उंबरगाव,बोहाळी या गावांना पाणीप्रश्नाच्या अनुषंगाने मोठा दिलासा मिळणार आहे. पुणे येथे राज्याचे महसूलमंत्री ना.श्री.चंद्रकांत दादा पाटील साहेब व सहकारमंत्री ना.श्री. दिलीप वळसे-पाटील व इतर राजकीय कार्य क्षेत्रातील मान्यवर मंडळी आणि संबधीत प्रशासकीय अधिकारी-पदाधिकारी उपस्थित होते.

सदर भीषण पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर उंबरगाव येथील श्री.विजय ज्ञानेश्वर पवार यांनी भाडगर कॅनॉल मध्ये पाणी सोडण्याकरीता सोनके येथे आंदोलन केले होते. आपल्या या मागणीची पाणी प्रशासन दखल घेत नसल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी गेल्या तीन तासांपासून सोनके येथील टॉवर वर आपला आंदोलन ठिय्या मांडला असल्याचे आमदार महोदय यांनी निदर्शनास आणून दिले आहे. पाणी व्यवस्थापनातील नियोजन अभाव व अपुरे कर्मचारी-अधिकारी यामुळे हे पाणी शेतकऱ्यांपर्यंत पोहचण्यास विलंब होत असल्याबद्दल आमदार महोदय यांनी तीव्र नाराजी व्यक्त करुन पाणी पुरेशा प्रमाणात उपलब्ध असून सुद्धा केवळ योग्य व्यवस्थेमध्ये समन्वय नसल्यामुळे हे पाणी आले नसल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले आहे.या बैठकीसाठी माजी सहकार मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील साहेब, आ.श्री.शहाजीबापू पाटील साहेब,आ.श्री.राहुलदादा कुल साहेब यांचेसह इतर मान्यवर अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.


## आ.आवताडे यांच्या प्रयत्नांतून म्हैसाळ उपसा सिंचन योजनेद्वारे पाणी सोडण्याच्या मागणीला यश

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर - मंगळवेढा विधानसभा मतदारसंघांमध्ये अपेक्षेप्रमाणे पर्जन्यमान न झाल्याने अनेक शेतकरी व पशुपालक पाण्याअभावी अक्षरशः हवालदील झाले आहे. दक्षिण भागाच्या सदर गावातील नागरिकांनी या योजनेचे पाणी सोडण्याबाबत आमदार आवताडे यांच्याकडे मागणी केली होती. या भागातील जनतेच्या सदर मागणी अन्वये म्हैसाळ उपसा सिंचन योजनेअंतर्गत पाणीटंचाई असलेल्या मंगळवेढा तालुक्याच्या दक्षिण भागातील सर्व तलाव, बंधारे पाण्याने भरून देण्याबाबत आमदार आवताडे यांनी सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व अधीक्षक अभियंता पाटबंधारे विभाग सांगली म्हैसाळ कालवा यांच्याकडे पत्राद्वारे केली होती.

आमदार आवताडे यांच्या या पत्राची दखल घेऊन संबंधित विभागाकडून या योजनेचे पाणी संबंधित गावांना सोडण्यात आले आहे.या पत्रामध्ये आमदार आवताडे यांनी नमूद केले होते की, मंगळवेढा तालुक्याच्या दक्षिण भागामध्ये गावभेट दौऱ्यानिमित्त अनेक गावात दौरा करत असताना पिण्याच्या पाण्याची व जनावरांच्या चाऱ्याची खूप मोठ्या टंचाईला या भागातील जनता सामोरे जात आहे. पाण्याची उपलब्धता नसल्याने अनेक शेतकरी व पशुपालक आपले पशुधन जगवण्यासाठी चार ते पाच हजार रुपये प्रति टन या दराने उसाचा चारा दुसऱ्या तालुक्यातून आणत आहेत. त्यामुळे अनेक शेतकरी पशुपालकांसाठी ही बाब आर्थिकदृष्ट्या परवडणारी नाही. आ आवताडे यांनी या सर्व बाबींचा सखोल पद्धतीने विचार करून या योजनेचे पाणी लवकरात लवकर सोडण्यात यावे अशी मागणी संबंधित अधिकाऱ्यांना केली होती.

या भागातील जनतेचा पाणी प्रश्न व आमदार आवताडे यांच्या मागणीचा रेटा लक्षात घेऊन या योजनेचे पाणी तालुक्याच्या दक्षिण भागातील सर्व ओढ्यावरील सिमेंट बंधारे भरून घेण्यासाठी वितरिका क्रमांक - २ द्वारे पाणी उपलब्ध सोडण्यात आले आहे. वाढत्या पाणीटंचाईच्या परिस्थितीशी संघर्ष करत असलेल्या या भागातील जनतेला या पाण्यामुळे पाणी प्रश्नाबाबत खूप मोठा दिलासा मिळाला आहे.

## वागदरी व नळदुर्ग परिसरात पोळा सण उत्साहात साजरा



वागदरी/एस.के.गायकवाड : दुष्काळाच्या सावटाखाली तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग व वागदरी परिसरात बैल पोळा हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शेकऱ्याच्या शेतात आयुष्यभर काबाडकष्ट करणाऱ्या बैलांच्या श्रमाला वर्षांतून एकदा तरी प्रतिष्ठा मिळवून देणारा सण म्हणजे बैल पोळा हा सण होय. यावर्षी पावसाने तब्बल दोन महिने दडी मारल्याने नदी नाले कोरडे पडले, खरीप हंगामातील पिकाने माना टाकल्या,जवळपास दुष्काळाचे सावट निर्माण झाले आहे. परंतु गेल्या आठवड्यात सलाईन लावल्यागत पाऊस पडला.त्यामुळे ऊसने आवसान आणून बळीराजा बैल पोळा हा सण साजरा करण्यासाठी उत्साहात पुढे सरसावला.खर तर रिमझिम पावसात हा सण साजरा करताना एक वेगळाच आनंद असतो. नदीच्या डोहात बैलांना अंघोळ घालणे त्यांना पोहायला लावणे वगैरे चा आनंद यावेळी वरूण राजा रूसल्याने शेतकऱ्यांना घेता आला नाही. परंतु उपलब्ध पाण्यात साबण शांपू लावून आपल्या बैलांना आंघोळ घालून हाळदी माती लावून रंगरंगोटी करून मानासन्मानाने पती पत्नी व कुटुंबातील प्रतिनिधी मिळून बैलांची व पशूधनाची पुजा करून उत्साहात त्यांची गावातून मिरवणूक काढून बैल पोळा हा सण साजरा केला.महिलानीही या सणामध्ये आनंदाने सहभाग नोंदवला.

## छत्रपती संभाजीनगर, धाराशिव महसुली विभाग नामकरण फलकाचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते अनावरण




छत्रपती संभाजीनगर : छत्रपती शिवाजी महाराज की जय...छत्रपती संभाजी महाराज की जय... या जयघोषाच्या निनादात छत्रपती संभाजीनगर महसुली विभागाचे आणि धाराशिव महसुली विभागाच्या नामकरण फलकांचे अनावरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज करण्यात आले.

मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या पार्श्वभूमीवर आज येथे मंत्रिमंडळ बैठकीसाठी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्यांचे छत्रपती संभाजीनगर येथे आगमन झाले. स्मार्ट सिटी कार्यालयात मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. पवार आणि मंत्रिमंडळातील सहकारी उपस्थित होते.यावेळी छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिव महसुली विभाग, जिल्हा, तालुका, गाव या नामकरण फलकाचे अनावरण मुख्यमंत्री श्री. शिंदे, उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी दिलेल्या छत्रपती शिवाजी महाराज की जय...छत्रपती संभाजी महाराज की जय या जयघोषामुळे परिसर दुमदुमला.

# पंढरपूर – मंगळवेढा विधानसभा कार्यक्षेत्रातील विविध विकास कामांसाठी ५७कोटी ६८लाख निधी मंजूर : आ.समाधान आवताडे



पंढरपूर – मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि धोरणात्मक प्रगतीसाठी आपल्या नेतृत्व साधनेच्या माध्यमातून नेहमीच आग्रही असणारे लोकप्रतिनिधी म्हणून आ समाधान आवताडे यांची मतदारसंघामध्ये विविध विकासकामांच्या माध्यमातून प्रतिमा उंचावत असल्याचे चित्र आहे. मतदारसंघातील सर्वसामान्य जनतेच्या रस्ते, वीज पाणी, शिक्षण, आरोग्य आदी सेवाक्षेत्रांच्या कार्यपूर्ततेसाठी आ आवताडे हे नेहमीच भरघोस निधीच्या रूपाने प्रयत्नशील असतात **– तानाजी काकडे(माजी सभापती पं.स. मंगळवेढा)**

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा कार्यक्षेत्रातील भारत देशाची दक्षिण काशी म्हणून ख्याती असणाऱ्या पंढरपूर शहराच्या व मंगळवेढा तालुक्यातील विविध रस्त्यांच्या विविध प्रलंबित विकास कामांसाठी चालू पावसाळी अधिवेशनादरम्यान ५७कोटी ६८लाख रुपये निधी मंजूर झाल्याची माहिती आमदार समाधान आवताडे यांनी दिली आहे.

आमदार आवताडे यांनी पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील विविध विकास कामांची पूर्तता होण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना.अजितदादा पवार, महसूल मंत्री तथा सोलापूर जिल्हा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक बांधकाम मंत्री ना.रवींद्र चव्हाण यांच्याकडे या निधीसाठी पत्रव्यवहार केला होता.

आमदार आवताडे यांच्या या मागणीची दखल घेऊन पंढरपूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाची सद्य काळात असणारी इमारत फार जुनी झाली असल्याने याठिकाणी उपविभागीय कार्यालयाच्या दोन इमारती उभारणीसाठी ६कोटी ३७ लाख रुपये इतका निधी मंजूर झाला आहे.

त्याचबरोबर पंढरपूर येथील सार्वजनिक बांधकाम विश्रामगृह याठिकाणी नवीन विश्रामगृह उभारणीसाठी आवश्यक निधी मिळण्यासाठीही आमदार आवताडे यांनी पाठपुरावा केला होता. देशातील प्रमुख तीर्थक्षेत्रांपैकी पंढरपूर हे एक अध्यात्मिक केंद्रस्थान आहे. त्यामुळे पंढरपूर येथे अनेक अतिमहत्त्वाच्या व महत्त्वाच्या व्यक्ती दर्शनासाठी येत असतात. या शासकीय विश्रामगृहामध्ये सध्या दहा कक्ष आहेत परंतु येथे येणाऱ्या व्यक्तींची संख्या पाहता सदर ठिकाणी सुसज्ज शासकीय विश्रामगृह बांधण्यासाठी २१कोटी १४लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे.

त्याचबरोबर मतदारसंघातील विविध गावांना व निरनिराळ्या ठिकाणी जोडणारे अनेक रस्ते काळ्या मातीतून जात असल्याने या ठिकाणी वाहतुकीला व दैनंदिन रहदारीला अडथळा निर्माण होऊन अनेक अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर रस्ते सुधारित व पक्के करण्यासाठी आ आवताडे यांनी काही रस्त्यांसाठी निधीची मागणी केली होती. या रस्त्यांच्या सुधारणा विकास कामांसाठी २६ कोटी ८४लाख इतका निधी मंजूर झाला आहे.

या निधी अंतर्गत मंजूर झालेले रस्ते – मंगळवेढा तालुक्यातील गुंजेगाव आंधळगाव पाटखळ नंदेश्वर भोसे हुन्नूर रेवेवाडी (खडकी ते नंदेश्वर) व (भोसे ते हुन्नूर) मध्ये सुधारणा करणे ५ कोटी, घेरडी हुन्नूर मारोळी सलगर ते प्रजिमा-८ मिळणारा रस्ता( लवंगी ते आसबेवाडी) रस्ता सुधारणा करणे १०कोटी , पंढरपूर तालुक्यातील तावशी ते चिचुंबे रस्ता सुधारणा करणे तसेच तावशी ते चिचुंबे मार्गावर व्ही आर-८६ येथे लहान पुलाचे बांधकाम करणेसाठी २ कोटी ८४ लाख, एमएसएच-८ भालेवाडी डोणज नंदुर रस्ता सुधारणा करणे ९कोटी.

# निफाडला शेतकरी स्वाभिमानी संघटनेचे रस्ता रोको आंदोलन

## ५० रुपये दराने टमाटो खरेदीची मागणी



**शासनाने शेतकऱ्यांकडून प्रति किलो ५० रुपये प्रमाणे टोमॅटो खरेदी करून शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसणे गरजेचे आहे .केंद्र आणि राज्य सरकारने शेतकऱ्यांना मोफत वीज मोफत बियाणे आणि खत पुरवठा करणे शेती पिकांना हमीभाव ठरवून देणे गरजेचे आहे तेव्हाच कुठेतरी शेतकरी जगेल.नाहीतर तो आत्महत्या सारखे पाऊल उचलले.– संजय पाटोळे, शेतकरी संघर्ष संघटना जिल्हाउपाध्यक्ष**

निफाड/प्रतिनिधी : शासनाने नाफेड मार्फत ५० रुपये किलो प्रमाणे टमाटो खरेदी करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा .या प्रमुख मागणीकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हाध्यक्ष निवृत्ती गारे यांचे नेतृत्वाखाली निफाड च्या शांतीनगर चौफुलीवर रस्ता रोको आंदोलन करून सरकारचे लक्ष वेधले . स्वाभिमानी शेतकरी सघटनेच्या वतीने पोलिस निरीक्षक बापूसाहेब महाजन यांना निवेदन देण्यात आले

असून या निवेदनात म्हटले आहे की गेल्या आठ दिवसात टमाटो भावात मोठी घसरण झाली आहे .

आज टमाटो ला अवघा २ते३ रुपये किलोचा भावं मिळत असून यात उत्पादन खर्च फिटने अवघड झाले आहे .त्यामुळे टमाटो विक्री ला नेणे देखील परवडत नसल्याने रस्त्यावर टमाटो ओतण्याशिवाय आमच्यापुढे पर्याय राहिला नाही .त्यामुळे शासनाने नाफेड मार्फत ५०रुपये प्रती किलो दराने टमाटो खरेदी करावा तसेच यापूर्वी विचार विक्री झालेल्या टमाटो ला २५रुपये किलो प्रमाणे अनुदान द्यावे कारण आता पावसाळा संपत आला असतांनाही पाऊस पडण्याची लक्षणे दिसत नाहीत त्यामुळे शेतातील उभी पिके पाण्याविना जळत असून या पिकांचे तात्काळ पंचनामे करून बँकांनी सुरू केलेली सक्तीची कर्ज वसुली तात्काळ थांबविण्यात यावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे याप्रसंगी स्वाभिमानीचे जिल्हा उपाध्यक्ष संजय पाटोळे .तालुका अध्यक्ष गजानन घोटेकर. दिंडोरी तालुका अध्यक्ष संदीप उफाडे .भगवान बोराडे.दत्तात्रय सुडके . सुनिल निकाळे .सुनिल कापसे.बाबुराव वाढवणे.नामदेव निकम.संजय जाधव.सागर गवळी.साहेबराव शिंदे.योगेश घोटेकर.दीपक घोटेकर. ज्ञानेश्वर तासकर .सोमनाथ तासकर. आदीसह शेतकरी उपस्थित होते.

# पंढरपूर येथे समृद्धी ट्रॅक्टरचा लकी ड्रॉ मोठ्या उत्साहात संपन्न



पंढरपूर/प्रतिनिधीः श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री.अभिजीत पाटील यांच्या समृद्धी ट्रॅक्टर्स, पंढरपूर येथे आज भव्य लकी ड्रॉ आयोजित करण्यात आला होता. प्रत्येकी दहा ग्राहकांमध्ये हा लकी ड्रॉ घेण्यात आला असून या लकी ड्रॉ मध्ये प्रथम बक्षीस म्हणून मोटर सायकल तर दुसरे बक्षीस म्हणून एलईडी टीव्ही तर तिसरे आटाचक्की व इतर सात ग्राहकांना वेगवेगळ्या प्रकारचे गिफ्ट देण्यात आले असल्याचे जाहीर केले होते.शनिवार दिनांक १६सप्टेंबर २०२३ रोजी पंढरपूर येथील समृद्धी ट्रॅक्टर, शोरूम येथे हा लकी ड्रॉ घेण्यात आला असून या लकी ड्रॉ मध्ये प्रथम बक्षिसाचे मानकरी म्हणून ता.पंढरपूर भोसे येथील श्री.मनोज नवनाथ माळी यांना प्रथम बक्षीस मोटर सायकल तर दुसरे लईडी टिव्ही बक्षीस श्री.संदीप नामदेव तरंगे रा-तरंगफळ आणि तिसरे बक्षीस आटा चक्की श्री. महादेव बबन जाधव रा-केसकरवाडी येथे देण्यात समृद्धी ट्रॅक्टरचे श्री.अभिजीत कदम तसेच श्री.रायाप्पा हळणवर यांच्या हस्ते आले. यावेळी सोनालीका कंपनीचे मॅनेजर श्री.ओंकार कोळी, श्री.शुभम माळी तसेच समृद्धी ट्रॅक्टरचे मॅनेजर श्री.सोमनाथ केसकर तसेच मोठ्या संख्येने ग्राहक उपस्थित होते.

गेल्या अनेक वर्षापासून शेतकऱ्यांना केंद्र बिंदू मानून समृद्धी ट्रॅक्टर काम करत आहे. शेतकरी ग्राहकांना नवनवीन योजना देत शेतकरीराजा सुखी समृद्धीमय व्हावा त्यामधून शेतकऱ्यांचे अर्थकारण उचवावे हाच प्रामाणिक प्रयत्न आहे. तरी सदर लकी ड्रॉ योजना ३०सप्टेंबर २०२३पर्यंत वाढीव करण्यात आली आहे तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आव्हान अमर पाटील यांनी सर्व शेतकर्यांना केले.

**–अमर पाटील, (कार्यकारी संचालक)**

# स्वेरीत रक्तदान शिबीर संपन्न,'अभियंता दिना' निमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा उपक्रम



पंढरपूर/प्रतिनिधी : गोपाळपुर ता.पंढरपूर येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयुट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व सोलापूर विद्यापीठ संलग्नित असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून अभियंता दिनाचे औचित्य साधून रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात पदवी अभियांत्रिकीच्या जवळपास २०० विद्यार्थी, विद्यार्थीनी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी ऐच्छीक रक्तदान केले.

कोणताही शैक्षणिक कार्यक्रम असो अथवा सामाजिक, स्वेरी विविध विधायक उपक्रमात नेहमीच हिरीरीने सहभाग घेत असते. स्वेरी अंतर्गत असलेल्या पदवी अभियांत्रिकीच्या राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत 'अभियंता दिना' च्या निमित्ताने या ऐच्छीक रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. धनंजय चौधरी, प्रा. रविकांत साठे व डॉ. एम. एम. आवताडे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांच्या सहकार्याने हे रक्तदान शिबीर राबविण्यात आले. या शिबिराचे उदघाटन जेष्ठ शिक्षणतज्ञ प्रा.नारायण दिवेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. महेशकुमार माने यांच्या मार्गदर्शनाखाली उपजिल्हा रुग्णालय पंढरपूरच्या वतीने जिल्हा समन्वयक शशिकांत डोंगरे, सुधीर भातलवंडे, कबीर काळेल, प्रयोगशाळेचे किशोर कवडे, सौरभ वेळापुरे व सहाय्यक कर्मचारी यांच्या सहकार्याने रक्त तपासणी, हिमोग्लोबिन सीबीसी,थायरॉईड प्रोफाईल, कॅल्शीअम, बीएसएल आर (शुगर), एएमएच (इन्फर्टीलिटी), प्रोलॅक्टीन, पांढऱ्या पेशीचे प्रमाण, सीए-१२५ (क्षयरोग) व रक्तगट अशा विविध तपासण्या मोफत स्वरुपात करण्यात आल्या. विद्यार्थिनी व प्राध्यापिका असे मिळून एकूण ७२ जणांनी या मोफत तपासणी शिबिराचा लाभ घेतला. चेअरमन डॉ.संजयकुमार शिंदे व प्रमुख प्रशासकीय अधिकारी उदय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अक्षय ब्लड सेंटर, सोलापूर व छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापूर या दोन रक्तपेढयांना पाचारण करण्यात आले होते. दोनही रक्तपेढ्यामध्ये मिळून अभियांत्रिकी महाविद्यालयातील एकूण विद्यार्थिनी, विद्यार्थी व प्राध्यापक असे मिळून जवळपास २०० जणांनी उत्स्फुर्तपणे रक्तदान केले. रक्तदान केल्यानंतर रक्तदात्यांच्या आरोग्याची काळजी संबंधित रक्तपेढीतील वैद्यकीय अधिकारी व त्यांचे कर्मचारी वर्ग घेत होते.

रक्तदानाची प्रक्रिया सुरळीतपणे पार पडण्यासाठी स्वेरीच्या विद्यार्थी-विद्यार्थीनींनी परिश्रम घेतले. यावेळी संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, संस्थेचे माजी अध्यक्ष व विश्वस्त धनंजय सालविठ्ठल, संस्थेचे माजी अध्यक्ष व विश्वस्त विजय शेलार, विश्वस्त बी.डी. रोंगे, युवा विश्वस्त प्रा.सुरज रोंगे, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार, प्राध्यापक वर्ग, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# निफाडला दंगेखोरांना मिळाला पोलिसांचा प्रसाद



निफाड/प्रतिनिधी : निफाड येथे शनिवारी सायंकाळी अचानकपणे शेतीमालाला भाव मिळावा यासाठी आंदोलन सुरू झाले. पोलिसांनी शांततेचे आवाहन करून देखील संतप्त आंदोलकांनी दंगल सुरू केल्याने पोलिसांना कठोर भूमिका स्वीकारणे भाग पडले. लाठीमार, अश्रुधूर अशा गोष्टींचा वापर करून दंगा शांत करण्यात पोलिसांना यश आले. अर्थात हे आंदोलन देखील खोटे होते आणि पोलिसांचा लाठी मार देखील खोटा होता. हे सर्व होते पोलिसांकडून करण्यात आलेला दंगाप्रतिबंधाचा सराव. आगामी सण उत्सवांच्या पार्श्वभूमीवर दंगल नियंत्रणासाठी पोलिसांकडून केली गेलेली ही रंगीत तालीम असल्याने भविष्यात काही सामाजिक ताणतणाव निर्माण झाल्यास परिस्थिती हाताळण्यास पोलीस यंत्रणा सक्षम असल्याची चुणूक यातून दिसून आली.

शनिवारी (दि. १६) सायंकाळी लासलगाव बाजार समितीच्या निफाड उपबाजार आवारात काही शेतकरी अचानक घोषणाबाजी करु लागले. कांद्यासह टोमॅटोला भाव मिळालाच पाहिजे या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. याबाबत निफाड पोलिसांना माहिती मिळताच पोलिसांचे बंदुकधारी पथक घटनास्थळी दाखल झाले. अग्निशामक दल, रुग्णवाहिका देखील घटनास्थळी दाखल झाल्या होत्या. शेतकऱ्यांना शांततेचे आवाहन करुनही आंदोलक ऐकण्याच्या परिस्थितीत नसल्याने अखेर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नीलेश पालवे यांच्या आदेशाने आंदोलकांवर लाठीचार्ज करण्यात आला. यावेळी आंदोलकांची एकच पळापळ झाली. या अनपेक्षित घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये घबराट पसरली होती. मात्र, आगामी सण – उत्सवांमध्ये संभाव्य दुर्घटना घडल्यास त्यास कशाप्रकारे प्रत्युत्तर द्यावे, यासाठी पोलिसांनी निफाड येथील बाजार समिती पटांगणात प्रात्यक्षिक घेतले. याचा एक भाग म्हणून सदर प्रात्यक्षिक राबविण्यात आल्याचे समजताच नागरीकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नीलेश पालवे यांच्या मार्गदर्शनाखाली निफाडचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बापू महाजन यांनी पोलिसांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले. यावेळी डिवाय एस पी विशाल क्षिरसागर.पि.एस.आय.विजय सोनवणे.लाड.लहामगे.उर्दे. विश्वनाथ निकम.व पोलीस अंमलदार नितीन सांगळे, ज्ञानेश्वर सानप, विलास बिडगर, राजू मनोहर ,भारत पवार, ड्रायव्हर सानप . व्हलगडे.आदी.पदाधिकारी तसेच सायखेडा, लासलगाव पोलीस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारीही उपस्थित होते. यापूर्वी निफाड शहराच्या प्रमुख मार्गांवरून पोलिसांचे संचलन देखील करण्यात आले.

# वारकरी भवनाचे जगद्गुरूंच्या दिव्य सानिध्यात भूमिपूजन संपन्न



सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयकुमार देशमुख यांनी विशेष प्रयत्न करुन आणलेल्या सुमारे १ कोटी १५ लाख रुपयांच्या निधीमधून प्रभाग क्रमांक ६ मधील गडदर्शन सोसायटी शेजारी असलेल्या जाम मिल मधील आरक्षित असलेल्या ५० हजार स्केअर फूट जागेपैकी १० हजार स्केअर फुट जागेत भव्य वारकरी भवन बांधण्याच्या कामाचा भूमिपूजन समारंभ शनिवार १६ सप्टेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता संपन्न झाला . श्री श्री श्री १००८ मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामी यांच्या अमृतहस्ते तसेच श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थानचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या कार्यक्रमास आमदार विजयकुमार देशमुख, सुधाकर महाराज इंगळे (राष्ट्रिय अध्यक्ष) , भागवत चवरे महाराज पंढरपूर , जोतीराम चांगभले तसेच शिवानंद पाटील , अमोल बापू शिंदे, संतोष पवार, किरण पवार, रेखा गायकवाड , लहू गायकवाड यांच्यासह मान्यवर उपस्थित होते .

सोलापूर प्रभाग क्रमांक ६ मधील दमाणी नगर भागातील जाम मिलमध्ये सोलापूर महानगरपालिकेची एकूण ५० हजार स्केअर फुट जागा आरक्षित आहे . यातील १० हजार स्केअर फूट जागेवर आमदार विजयकुमार देशमुख यांनी विशेष प्रयत्न करुन सुमारे १ कोटी १५ लाख रुपये निधी वारकरी भवन बांधण्यासाठी मंजूर करून घेतला आहे . या वारकरी भवन विकासासाठी २५ लाख रुपये निधी उपलब्ध करून देतो असे अमोल बापू शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले.

सुधाकर इंगळे महाराजांच्या अधिपत्याखाली दरवर्षी नॉर्थकोट प्रशालेच्या मैदानावर माघवारी पालखी रिंगण सोहळा पार पडतो. या सोहळ्यासाठी आमदार विजयकुमार देशमुख उपस्थित असतात . अशाच एका रिंगण सोहळ्याप्रसंगी मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामी यांनी सोलापुरात वारकरी भवन असावे , अशी इच्छा आमदार विजयकुमार देशमुख यांच्याकडे जाहीर बोलून दाखवली होती. त्यावेळी आमदार विजयकुमार देशमुख यांनी हजारो वारकऱ्यांच्या समक्ष सोलापुरात वारकऱ्यांसाठी वारकरी भवन बांधून देण्याचा शब्द दिला होता आणि तो शब्द आमदार विजयकुमार देशमुख यांनी पूर्ण केला . त्यावेळी आमदार विजयकुमार देशमुख पालकमंत्री असल्यामुळे त्यांनी नियोजन विभागातून निधी उपलब्ध केला होता . १६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता टाळ मृदंगाच्या गजरात दिंडीला प्रारंभ झाला. या दिंडीत महिला पुरुष भाविक खुप उत्साही दिसत होते. दिंडी जागेवर आल्या नंतर वारकरी भवनाच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले . या सोहळ्यासाठी सोलापूर शहरातील सर्व दिंडी प्रमुखाकडून जय्यत तयारी करण्यात आली होती . हे भूमिपूजन झाल्यानंतर प्रत्यक्ष वारकरी भवनाच्या कामाचा श्री गणेशा होणार आहे. वारकरी भवन कसे असावे ? हायटेक प्रणाली, व्हाय फाय, ई. प्रगत तंत्रज्ञान वारकरी परंपरेसाठी उपयोगात आणले जाईल. या वारकरी भवनाच्या माध्यमातून वारकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्याबरोबरच वारकरी संप्रदायाला लागणाऱ्या सर्व गोष्टींचा विचार विनिमय करण्याबरोबरच वारकरी भवनच्या माध्यमातून हजारो वारकरी तयार करण्याचा मानस असल्याचे सुधाकर इंगळे महाराज यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले . या वारकरी भवनामध्ये पंढरीच्या श्री विठ्ठलाची भव्य दिव्य आखीव आणि रेखीव मूर्ती बसविण्याबाबत सोलापूर महानगरपालिकेची चर्चा केली असल्याचेही सुधाकर इंगळे महाराज यांनी सांगितले. त्या विचाराला सद्यस्थितीची जोड देण्यासाठी वारकरी भवन हे उपयुक्त ठरेल आणि तशी यंत्रणा असावी असे मत मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामी यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय पवार ( शहर अध्यक्ष) यांनी केले व आभार नागनाथ पाटील यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने कारण्यात आली. सोलापूर जिल्हा व शहर परिसरातील वारकरी भाविक उपस्थित होते.